# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## निवडणूक अपिलीय अधिकारी तथा कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचेसमोर

## निकालपत्र

### विद्यापरिषदेद्वारे व्यवस्थापन परिषद निवडणूक- अपील क्र. ७/२०१८

डॉ. विलास खंदारे विरुद्ध निवडणूक निर्णय अधिकारी (डॉ. जितेंद्र अहिरराव यांच्या संदर्भात)

**विषय:-** "विद्या परिषद सदस्यांमधून व्यवस्थापन परिषद निवडणूक संदर्भात प्राप्त अर्ज अवैध ठरविण्याबाबतचे अपील.

असे की, डॉ. विलास खंदारे यांनी डॉ. जितेंद्र अहिरराव यांच्याविरुद्ध अपील दाखल केले आहे. सदर अपिलात अपीलकर्ता डॉ. खंदारे यांनी असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २५ नुसार विद्यापीठाच्या प्राधिकरणाचे, समित्यांचे किंवा मंडळाचे सदस्य भारतीय दंड संहितेच्या कलम २१ नुसार लोकसेवक आहेत. डॉ. अहिरराव यांना चार अपत्य असून एक अपत्य हे २००६ नंतरचे आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ डॉ. अहिरराव यांना लागू होत असल्यामुळे ते व्यवस्थापन परिषद सदस्य पदाच्या निवडणुकीस अपात्र आहेत. करिता डॉ. अहिरराव यांचा विद्या परिषदेतून व्यवस्थापन परिषद सदस्यत्वासाठी केलेला नामनिर्देशन अर्ज अवैध ठरविण्याची विनंती केली आहे.

असे की, अपीलकर्ता डॉ. खंदारे यांनी डॉ. अहिरराव यांच्या चार अपत्यांदर्भात तसेच २००६ नंतर झालेल्या एका अपत्यासंदर्भात अपिलात जो उल्लेख केलेला आहे त्याच्या पुष्ट्यर्थ निगडीत कागदपत्रे, पुरावा अर्जासोबत दाखल करणे आवश्यक होते. परंतु डॉ. खंदारे यांनी यासंदर्भात निगडीत कोणतीही कागदपत्रे, पुरावा सोबत दाखल केलेला नाही.

करिता, पुराव्याअभावी सदरील अपील हे तथ्यहीन असल्याचे दिसून येते.

करिता मी प्राध्यापक बी. ए. चोपडे, कुलगुरू तथा निवडणूक अपिलीय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थींचे अपील वरील नमूद कारणास्तव फेटाळण्यात येत आहे.
२. सदर निर्णय कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संबंधितांना टपालाद्वारे कळवावा व सदर संचिका निवडणूक अभिलेख कक्षाकडे वर्ग करण्यात यावी.

Bzchopade
21/06/2018

**प्राध्यापक बी. ए. चोपडे,**
**कुलगुरू तथा निवडणूक अपिलीय अधिकारी**

**दिनांक:- २१-०६-२०१८**